**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र.१ यांचा उलटतपास</u>**

**<u>प्रतिवादी क्र.१३ व १९ तर्फे विधिज्ञ श्री.वाय.आर.खानोलकर यांचे मार्फत शपथेवर सुरु –</u>**

१. देवजी सुरभा परब हे माझ्या माहितीचे आहेत. ते माझे वारसी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, त्यांना मी सदर दाव्याच्या कामी पक्षकार केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा परिशिष्ट 'ब' मधील मिळकती या कुळ कायद्यान्वये प्राप्त झालेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, त्याचे ३२ 'म' चे प्रमाणपत्र हे केवळ गोपाळ याच्या नावे आहे. मी सदर प्रमाणपत्र पाहिलेले आहे. मी सदर प्रमाणपत्र आव्हानित किंवा त्यावर अपिल दाखल केलेले नाही. मी दाखल केलेले आकार फोडपत्रक पाहिलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यावर केवळ गोपाळ याच्या एकट्याच्या नावाची नोंद आहे. गोपाळ आत्माराम परब यांनी एकत्रित कुटुंबाच्या दावा परिशिष्ट 'ब' मधील मिळकती विक्रीत घेतलेल्या आहेत, याबाबत मी पुरावा दाखल केलेला आहे. माझ्या म्हणण्याप्रमाणे त्याबाबत मी आकार फोडपत्रक दाखल केलेले आहे. मी दाव्यासोबत दाखल केलेले गुणाकारपत्रक पाहिलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर गुणाकारपत्रकामध्ये देखील सर्व मिळकती या केवळ गोपाळ याच्या नावे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, दावा परिशिष्ट 'ब' मधील मिळकतीची विक्री होण्याबाबत झालेले आदेश हे गोपाळ आत्माराम परब यांचे नावे झालेले आहेत. माझ्या म्हणण्याप्रमाणे गोपाळ आत्माराम परब यांच्या नावे जी विक्रीची प्रक्रिया पुर्ण झाली ती चुकीची आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा परिशिष्ट 'ब' मधील सर्व मिळकती या गोपाळ परब यांच्या कुळवहिवाटीच्या मिळकती असून, त्यांच्याच नावे विक्रीची प्रक्रिया पुर्ण झालेली आहे व तसे प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, आकार फोडपत्रक, गुणाकारपत्रक व ३२

'म' प्रमाणपत्र यामध्ये कोठेही गोपाळ आत्माराम परब यांनी एकत्र कुटुंबाकरीता जमीन विक्रीत घेतल्याची नोंद नाही. ज्या फेरफाराने गोपाळ आत्माराम परब यांचे दावा परिशिष्ट 'ब' मधील मिळकतींना नाव लागले त्या फेरफाराबद्दल मी अपील दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा परिशिष्ट 'ब' मधील मिळकती केवळ गोपाळ यांच्या कुळवहिवाटींच्या असुन, आमचा त्याच्याशी कोणताही संबंध नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.१६ ते १८ यांनी प्रतिवादी क्र.१३ याच्या लाभात दिलेले हक्कसोडपत्र मी आव्हानित केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा परिशिष्ट 'ब' मधील मिळकती वाटपास पात्र नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.१३ शशिकांत आत्माराम परब हा मयत गोपाळ आत्माराम परब यांचा नातू म्हणून एकमेव वारस आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा परिशिष्ट 'अ' मधील मिळकतीमध्ये त्याचा १/४ हिस्सा आहे.

**प्रश्नः** प्रतिवादी क्र.१३ ने प्रतिवादी क्र.१९ याचे लाभात दिलेले खरेदीखत तुम्ही आव्हानित केलेले नाही ?

**उत्तरः** त्याबाबत मला माहिती नाही.

२.          हे मला माहिती नाही की, प्रतिवादी क्र.१९ यांनी मिळकत खरेदी करण्यापुर्वी जाहीर नोटीस देऊन मोजणी केल्यानंतर खरेदी केली आहे किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, सर्व्हे नं.१४८, हिस्सा नं.१४ मध्ये सन २०१५ पासून प्रतिवादी क्र.१९ यांचाच कब्जा आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१३ व १९ विरुध्द चुकीचा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, सर्व्हे नं.१४८, हिस्सा नं.१४ शी आमचा वाटपाचा कोणताही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा परिशिष्ट 'ब' मधील मिळकती या केवळ प्रतिवादी क्र.१३ याच्या मालकीच्या आहेत. त्यामुळे त्याचा वाटपाशी कोणताही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी चुकीची व

अपुर्ण माहितीवर चुकीचा दावा दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी चुकीचे शपथपत्र दाखल करुन आजरोजी चुकीची साक्ष देत आहे.

**प्रतिवादी क्र.१३ व १९ तर्फे उलटतपास पुर्ण.**

**प्रतिवादी क्र.१ ते ४, ११, १२, १५ पुकारता गैरहजर, तर्फे विधिज्ञ गैरहजर. सबब, त्यांचेतर्फे वादीचा उलटतपास नाही.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती

सही/–

(आर.जी.कुंभार)

दिनांक– ०८/०१/२०२६ अति.सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),कुडाळ.